# सेवक व सेविका, लहान गटाचे पुढारी आणि आठवड्यात कार्यक्रमांचे पुढारीपण करणाूयांठी मार्गदर्शक तत्वे सुरुवात करणे

Download Paul-Timothy studies freely from www.Paul-Timothy.net

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू प्रेषितांची कृत्ये यामधील मंडळ्यांना तू सामर्थ्य दिलेस, तसेच सामर्थ्य आमच्या मंडळीलाही सेवाकार्याचा विकास करण्यास दे आणि त्यांच्या प्रमाणेच सेवा करण्याचे साहाय्य कर."



विश्वासणारे बहुतेक वेळा एकमेकांची सेवा करण्यासाठी आणि समाजातील लोकांना मदत करण्याकरिता आठवड्यात एकत्र भेटतात. ते लोकांसाठी प्रार्थना करतात. शिष्य करतात आणि विविध सेवाकार्ये पार पाडतात. कधी कधी पुरुष किंवा स्त्रिया एक गट म्हणून एकत्र येतात. मोठी कुटुंबे किंवा दोन वा तीन कुटुंबे कौटुंबिक भक्तीसाठी एकत्र येतात. ह्या सभांचे पुढारीपण कधी कधी सेवक आणि सेविका करतात. तसेच आठवड्यातील कार्यक्रमांवर देखरेख ठेवतात. गरजू लोकांची सेवा करणाूया गटांचे नेतृत्व बरेचदा सेविका करतात.

1. **सेवक वा सेविकांची नेमणूक करा, ते गरजूंची काळजी घेणाूया कार्याचे नेतृत्व करतील आणि आठवड्यातील इतर कार्यक्रमांमध्ये विश्वासणूयांना साहाय्य करतील.**

- पाहा 1 तीमथ्य 3:8–13 मध्ये सेवक वा सेविका म्हणून नेमणूक झालेल्यांच्या अंगी कोणते आवश्यक गुण असावेत.
- प्रेषितांनी केले त्याप्रमाणे सेवकांवर हात ठेवा. त्यांना अभिषेक करण्याची पवित्र आत्म्याला विनंती करा. मंडळीच्या बाहेरच्या लोकांशीही असेच वागा.
-
- आवश्यकता पडल्यास ह्या गरजा भागविण्यासाठी विश्वासणूयांना पैसा, वेळ, मदत किंवा वस्तुरूपाने काही देण्यास सांगा.

  यरूशलेमेतील सेवकांनी काय केले ते पाहण्यासाठी प्रे. कृ. 6:1–7 वाचा.
- नवीन मंडळीला सेवकांची नेमणूक करण्याची प्रेरणा व्हावी अशी कोणती गरज निर्माण झाली?
- सेवक म्हणून नेमणूक होण्यास आणि गरजू विधवांची सेवा करण्यासाठी एखाद्याच्या अंगी कोणते आवश्यक गुण असावेत?
- पवित्र आत्म्याने व ज्ञानाने पूर्ण व्यक्तींची नेमणूक झाल्यावर काय घडले? (वचन 7 मध्ये उत्तर पाहा)
- रोम 16:1 मध्ये सांगितले आहे की फीबी तिला 'सेविका' असेही म्हटले आहे, ती मंडळीची सेवा करीत असे.
- पवित्र शास्त्रामध्ये 'डीकन' म्हणजे 'सेवक'

2. **तुम्ही व तुमच्या बरोबर काम करणारे पुढील आठवड्यात काय करणार त्याबद्दल योजना आखा.**

नवीन मेंढपाळांच्या अभ्यासक्रमात उपासनेमध्ये शिकविलेल्या आठवड्यातील विषयाशी संबंधित काही माहिती दिलेली आहे. ही माहिती नवीन मेंढपाळांच्या प्रत्येक अभ्यासात दुसूया भागात दिलेली आहे. त्याचे शीर्षक "सहकाूयासोबत पुढील आठवड्यातील कार्यक्रमांचे नियोजन करा" किंवा यासारखे शब्द असे आहे.

प्रत्येक अभ्यासात तुम्ही आणि तुमच्या सहकाऱ्यांनी करावयाच्या कार्यक्रमांची यादी दिलेली आहे. त्यापैकी विश्वासणाऱ्यांच्या गरजांनुरूप कार्यक्रम निवडा. इतर कार्यक्रमांकडे दुर्लक्ष करा.

तुमच्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन ह्या कार्यक्रमांची आखणी करा. मुख्य उपासनेपूर्वी हे काम केल्यास काय केले पाहिजे हे तुम्हांला लोकांना उपासनेदरम्यान स्पष्ट करून सांगता येईल.

तुमच्या योजना कागदावर उतरवा आणि तुमच्या मंडळीतील मेंढपाळाबरोबर त्याविषयी चर्चा करा. तुम्ही पुढील आठवड्यातील उपासना व इतर कार्यक्रमांविषयी नियोजन करण्यासाठी एकत्र याल तेव्हाच ते व इतर पुढारी यांच्याबरोबर हेही नियोजन करा. पुढच्या उपासना सभेत याविषयी घोषणा करण्याची व्यवस्था करा. याच सभेत कोण काय, कोठे व केव्हा करणार हे देखील ठरवा. यामध्ये अगदी नेमकेपणा ठेवा. योजनेमध्ये कदाचित पुढील कार्यक्रमांचा समावेश असेल.

- ख्रिस्तरूपी शरीरात एकमेकांची सेवा करा, गलती 6:10 मध्ये सांगिल्याप्रमाणे.
- आपल्या कुटुंबियांची सेवा करा, इफिस 5:21 ते 6:4 आपल्याला सूचना करतात.
- इतर मंडळ्यांशी सहकार्य करा. प्रे. कृ 15:40–41 मध्ये पौलाने असेच केले.
- येशूने मत्तय 5:13–14; 25:31–46 मध्ये आज्ञा दिल्यानुसार आपल्या आसपास असणारे आपले मित्र शेजारी, शत्रू आणि समाजाची सेवा करा.
- पौलाने 2 तीमथ्य 2:2 मध्ये तीमथ्याला सांगितल्याप्रमाणे इतरांना सेवेसाठी तयार करा.
- करावयाच्या इतर आवश्यक गोष्टीचे नियोजन करा.

Copyright © 2003 by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net

